24 JUN 2017 महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'डांगे यांच्या दूरदृष्टीचा सन्मान'

**म. टा. वृत्तसेवा, इस्लामपूर**

'डांगे अभियांत्रिकी महाविद्यालयाला मिळालेला स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा हा आण्णासाहेब डांगे यांच्या दूरदृष्टीचा व शैक्षणिक कर्तृत्वाचा सन्मान आहे. फक्त या महाविद्यालयासाठीच नव्हे तर शिवाजी विद्यापीठासाठी देखीलही अभिमानाची बाब असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

डांगे महाविद्यालयाला नुकताच स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा मिळाला, त्याचे प्रमाणपत्र कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते आण्णासाहेब डांगे यांच्याकडे प्रदान करण्यात आले. यावेळी झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी अॅड. चिमण डांगे, कार्यकारी संचालक आर. ए. कनाई, प्राचार्य ए. एम. मुल्ला, डॉ. एल. वाय. वाघमोडे प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'प्रयत्नपूर्वक कष्ट केल्यानंतर गुणवत्ता मिळते. ती जोपासणे व त्यामध्ये वाढ करणे ही सर्व समावेशक भूमिका असते. या शैक्षणिक संकुलातील विविध अभ्यासाक्रमाना मिळालेले आय. एस. ओ. मानांकन हे केवळ प्रमाणपत्रापुरते नाही हे या शैक्षणिक संकुलात पावलोपावली जाणवते.'

आण्णासाहेब डांगे म्हणाले, 'सरकारने राज्यातील सहा सरकारी अभियांत्रिकी महाविद्यालये यापूर्वी स्वायत्त केली आहेत. परंतु खासगी महाविद्यालयांच्या बाबतीत मात्र पक्षपात केला आहे. सध्या पदवी घेवून बाहेर पडलेल्या अभियात्यांना कामाच्या ठिकाणी वर्षभर प्रशिक्षण घ्यावे लागते. त्यासाठी अभ्यासक्रमात बदल करून चांगले अभियंते निर्माण केले पाहिजेत.'




**आण्णासाहेब डांगे यांना प्रमाणपत्र प्रदान करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. यावेळी उपस्थित अॅड. चिमण डांगे, आर. एन. कनाई आदी.**

24 JUN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुण्यनगरी

# दूरशिक्षणच्या तेरा अभ्यास केंद्रांना मान्यता

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठ समाजाभिमुख व विद्यार्थीकेंद्रित हेतूने स्थापन झाल्याने विद्यापीठाने सुरुवातीपासून बहिःस्थ परीक्षा पद्धती सुरू केली आहे. ज्या विद्यार्थी, गृहिणी, नोकरदार, सैनिक, उद्योजक, शेतकरी, कामगार, कैदी अशांना रीतसर महाविद्यालयात प्रवेश घेता येत नाही, त्यांना आपले शिक्षण पूर्ण करता येते. शिवाजी विद्यापीठाने कार्यक्षेत्रामध्ये नव्याने १३ अभ्यास केंद्रांचा समावेश यावर्षी केला आहे.

आजच्या बदलत्या जागतिक घडामोडीमध्ये आपला विद्यार्थी रोजागाराभिमुख झाला पाहिजे. विद्यापीठाचे दूरशिक्षण केंद्र बी.ए. बी.कॉम, एम.ए., एम.कॉम, एम.बी.ए. (डिस्टन्स मोड/



एक्झिक्युटिव्ह मोड), एम.कॉम (व्हॅल्यूएशन फॉर रियल इस्टेट), पी. जी. डिप्लोमा इन टान्सलेशन आदी अभ्यासक्रमांबाबत विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यास बांधिल राहिल्याने दूरशिक्षण अभ्यासक्रमाकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत चालला आहे. विद्यार्थ्यांचा कल वाढत असल्याने विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयामध्ये यंदा अभ्यास केंद्रांच्या संख्येत वाढ झाली आहे.

यामध्ये नव्याने १३ अभ्यास केंद्रांचा समावेश या शैक्षणिक वर्षामध्ये करण्यात आला आहे. जिल्ह्यातील सात व सांगली तीन व सातारा तीन या नव्याने सुरू होणाऱ्या अभ्यास केंद्रांना प्रशासकीय मान्यता देण्यात आल्याने एकूण दूरशिक्षण केंद्राच्या अभ्यास केंद्राची संख्या ६० इतकी झाली आहे.

**नव्याने सुरू झालेली अभ्यास केंद्रे**

**कोल्हापूर जिल्हा :** श्रीमती आक्काताई रामागोंडा पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी, लहू बाळा परितकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पणोरे, कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय गडहिंग्लज, श्री संत गाडगेबाबा महाविद्यालय कापशी, गोपाळ कृष्ण गोखले कॉलेज कोल्हापूर, आर्टस् कॉलेज कोवाड, ता. चंदगड, दूधसाखर महाविद्यालय बिद्री.

**सांगली जिल्ह्यामधील अभ्यास केंद्र :** बळवंत कॉलेज विटा, मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय कडेगाव, विठ्ठल (दाजी) पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सलगरे.

**सातारा जिल्ह्यामधील अभ्यास केंद्र :** सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज कराड, श्रीपतराव भगवंतराव महाविद्यालय औंध. धनंजयराव गाडगीळ कॉलेज ऑफ कॉमर्स सातारा.